Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- VIII AUGUST 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- विशेष संदर्भ कोल्हापूर महानगरपालिका

**प्रा. पदमाकर बळीराम तटाळे**
अर्थशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर
Email.padmakartatale487@gmail.com

## प्रस्तावना

भारतात स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास पाहता हा खूप प्राचीन असल्याचा आपणास दिसून येतो. भारतात प्राचीन काळापासून यासारख्या संस्था कार्यरत असल्याचेही आपणास पहावयास मिळतात. ग्रामीण भागातील लोक एकत्र येऊन गावातील समस्यावर विचार विनिमय करीत त्यासाठी गावातील नागरिकांची सभा भरविली जात असे तिला ग्रामसभा असे म्हणत. वैदिक काळात देखील ग्रामसभेचा उल्लेख आपणास ऋग्वेदात आढळतो .ब्रिटिश सरकारच्या काळात स्थानिक स्वराज संस्थेत आमूलाग्र बदल झाले तत्कालीन ब्रिटिश शासनाने प्रथम 1850 च्या कायद्याने ग्रामपंचायतीपेक्षा मोठ्या शहरातून नगरपालिका स्थापन करण्याचा हक्क त्या त्या नगरातील लोकांना दिला. त्यानुसार स्थानिक संस्थांची निर्मिती झाली. या कायद्यानुसार महाराष्ट्रातील सातारा, वाई आदी शहरांमधून नगरपालिका स्थापन झाल्या त्यामुळे शासन व नागरी जनता यात प्रत्यक्ष संपर्क सुरू झाला . पुढे लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेला मर्यादित स्वरूपात स्वायतता दिली. 1907 मध्ये रॉयल कमिशन ऑन डीसेंट्रलायझेसन नेमण्यात आले या आयोगाने ग्रामपंचायती मजबूत करण्याची शिफारस केली व त्यानंतर 1919 च्या भारत सरकारच्या कायद्यात कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थेचा टप्प्याटप्प्याने विकास करण्याचे धोरण जाहीर झाले त्यानुसार सर्व प्रांतामध्ये ग्रामपंचायत ,जिल्हाबोर्ड, नगरपालिका यासारखा संस्था स्थापन झाल्या या पुढील काळात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात लोकशाही प्रणाली विकसित करण्याच्या उद्देशाने सरकारने कल्याणकारी शासन व्यवस्थेचा स्वीकार केला या संकल्पनेत केंद्र शासन, राज्य शासन आणि ग्रामपंचायतीपासून ते महानगरापर्यंतच्या सर्व स्थानिक संस्थांना स्वायत्तता प्रदान करण्यात आली.

## संशोधन लेखाचा उद्देश

महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- विशेष संदर्भ कोल्हापूर महानगरपालिका हा संशोधन लेख पुढील उद्देश समोर ठेवून लिहिण्यात आला

1. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या ज्ञात करणे.
3. कोल्हापूर महानगरपालिकेच्या संदर्भात अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन लेख लिहित असताना यात प्रामुख्याने व्यष्टी संसोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे त्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरण्यात आली आहे याबरोबरच या संशोधनासाठी दुय्यम आधारसामग्री चा वापर करून हा संशोधन लेख लिहण्यात आला आहे.

महाराष्ट्रात पंचायत राज्याची पद्धती स्वीकारण्यापूर्वी 1960 मध्ये त्यावेळचे महाराष्ट्राचे महसूल मंत्री श्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली व या समितीने आपला अहवाल 1961 मध्ये शासनाला सादर केला व हा अहवाल शासनाने मान्य करुन त्यानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम 1961 हा कायदा संमत केला व त्यानुसार महाराष्ट्रात 1 मे 1962 रोजी महाराट्रात पंचायत राज्याची स्थापना झाली व त्यानुसार जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, तालुका पातळीवर पंचायत समिती, आणि ग्रामपातळीवर ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय पद्धती स्वीकारले गेली. नागरी भागात नगरपरिषद, महानगरपालिका, कटक मंडळे व शहर विस्तार समित्या यासारख्या संस्था स्थापन करून नागरी भागातील प्रशासन चालवले जाताना आपणास दिसून येते. कोल्हापूर महानगरपालिकेचा अभ्यास

करण्यापूर्वी कोल्हापूर शहरा विषयी थोडक्यात माहितीचा अभ्यास करणे या ठिकाणी आवश्यक वाटते कोल्हापूर हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे शहर असून प्राचीन काळापासून दक्षिण काशी या नावाने प्रसिद्ध आहे महालक्ष्मी मंदिर आणि ज्योतिबाचे मंदिर यामुळे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते तसेच ऐतिहासिक दृष्ट्या कोल्हापूर महत्वाचे शहर असून प्राचीन काळापासून ते विविध राजघराण्याचे राजधानीचे ठिकाण होते. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारने मुळे कोल्हापूरने नवा आदर्श निर्माण केला. कोल्हापूर हे कला, शिक्षण, उद्योग, खेळ व विशेषता कुस्ती साठी प्रसिद्ध आहे. महालक्ष्मीच्या प्रतीष्टापनेनंतर शहराचा उल्लेख करवीर असा आढळतो. त्यापूर्वी कोल्लापूर, कोल्लपूर, कोल्लगिरी, कोल्लदिगिरीपट्टन असे नावे प्रचलित होते. कोल्ल म्हणजे दरी व दर्याचे गाव म्हणजे कोल्हापूर अशी ही व्युत्पती मानली जाते.सारांश काय तर ब्रह्मपुरी, करवीर व कोल्हापूर अशी स्थल नामाची बहुविध रुपे आपणास पहावयास मिळतात. महालक्ष्मीच्या देवलयाच्या स्थापनेमुळे कोल्हापुरात धार्मिक केंद्राचे स्वरूप प्राप्त झाले त्यातूनच सांस्कृतिक व आर्थिक क्रांतीचे नानाविध रुपे प्रकट झालेले आपणास पहावयास मिळतात . कोल्हापुरात 12 ऑक्टोबर 1956 रोजी प्रथम नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. नगरपरिषदेची स्थापना झाल्यानंतर आधुनिक कोल्हापूर शहराच्या पद्धतशीरपणे विकास होण्यास प्रारंभ झाला. 1939 ते 1945 हा कालावधी नगरपालिकेच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिण्यासारखा आहे या काळात नागरी जीवनाच्या विविध क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण परिवर्तन घडून आले मात्र 1941 मध्ये झालेल्या त्रेवार्षिक निवडणूकीत स्थानिक स्वराज्य संघ ही संस्था स्थापन करण्यात आली. त्यात भाई माधवराव बागल,गोविंदराव कोरगावकर रत्नाप्पा कुंभार या तिघांचे नियंत्रण मंडळ स्थापन करण्यात आले. कोणताही भेद न करता जनतेचे निरपेक्ष सेवा करणे हे या संघाचे धेय होते इतर कोणतेही राजकीय संस्थेची या संघाचा संबंध नव्हता दरबारने स्थानिक स्वराज्याचे जेवढे हक्क जनतेच्या हवाली केले आहेत त्याचा पुरेपूर उपयोग करून घेणे हे आपल्या संघाचे कर्तव्य वाटते असे या संघाच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे .1954 ते 1971 हा कालखंड कोल्हापूर शहराच्या गतिमान विस्ताराचा कालखंड म्हणून ओळखला जातो या काळात नगरपालिका वेगाने महानगरपालिकेकडे वाटचाल करताना आढळते 1960 साली नगरपालिकेत 44 सदस्य कार्यरत असल्याची नोंद आहे त्यापैकी 37 सर्वसाधारण, तीन मागास वर्गासाठी राखीव व 4 स्त्रीयासाठी राखीव आसल्याचे आढळते. 1956- 57 सालापासून शहरात रस्त्याचे जाळे तयार झाले, आवश्यक तेथे नवीन पूल उभारण्यात आले, पाणी पुरवठा व्यवस्था कार्यक्रम करण्यात आले ,नवनवीन मार्केट ,उद्याने उभारून शहराच्या सौंदर्यात भर टाकण्यात आली याचाच परिणाम म्हणून कोल्हापूर शहरात उदयोगप्रियता वाढीस लागून यांत्रिकीकरणाचे नवे युग सुरू झाले उदयम नगरीच्या विशाल परिसर यंत्रसामुग्री व सुटे भाग यांच्या निर्मिती कार्यात मग्न राहिला. कोल्हापूर उद्योग वसाहतीतील उत्पादने अनेक आशियाई, आफ्रिका देशात निर्यातही होऊ लागले. कोल्हापूर शहराच्या औद्योगिक वाटचालीत नगरपालिकेला वारंवार साहय्याभूत असे कार्य केले. याच कालखंडात 1962 साली राधाकृष्णन यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली व कोल्हापूर हे प्रगत शैक्षणिक पुनर्रचनेचे केंद्र म्हणून उदयास आले. या काळात अशा प्रकारेनगरपालिकेच्या सहयोगाने औद्योगिक व शैक्षणिक पूर्णरचनेत हातभार लागला. डिसेंबर 1972 मध्ये नगरपरिषद मंडळ बरखास्त करण्यात आले व त्याचे महानगरपालिकेत रूपांतर झाले. शहराची वाढती लोकसंख्या व वाढत्या नागरी समस्या सोडविण्यासाठी नगरपालिका ही काळाची गरज होती 1972 ते 1978 या काळात द्वारकानाथ कपूर ,श्री ना. मा.देवस्थळे ,श्री डी. टी.जोसेफ, श्री वी.ना. माखिजा यांनी प्रशासक या नात्याने कार्य पाहिले 1960च्या नगर विकास योजनेनुसार नगररचनाशास्त्राच्या आधारे उपनगराची रचना करण्यात आली.विकासयोजना राबविताना विस्थापित झालेल्या नागरिकांचे पुनर्वसन करण्याचा कार्यक्रम देखील या वेळी अमलात आणला गेला.

1978 मध्ये खऱ्या अर्थाने पहिले लोकनियुक्त महानगरपालिका अस्तित्वात आली या काळात श्री बाबासाहेब कसबेकर, नानासाहेब यादव, द न कनेरकर, बाबुराव पारखे, सुभाष राणे यांनी महापौर या नात्याने कोल्हापूर शहराच्या विकासात सिंहाचा वाटा उचलला आहे.

**महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था**

महाराष्ट्रात सध्या ग्रामीण व नागरी भागात खालील प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था कार्य करताना दिसून येतात

| ग्रामीण | संख्या | नागरी | संख्या |
|---|---|---|---|
| **जिल्हा परिषद** | 33 | महानगरपालिका | 27 |
| **पंचायत समिती** | 351 | नगरपरिषद | 237 |
| **ग्रामपंचायत** | 27896 | कटक मंडळे | 07 |

वरील आकडेवारीचा विचार करता सध्या महाराष्ट्रात 33 जिल्हा परिषदा, 351 पंचायत समिती व 27896 ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम चालू आहे तर 27 महानगरपालिका 237 नगरपरिषद वसाहत कटक मंडळाच्या माध्यमातून नागरी भागात प्रशासन चालवले जात असल्याचे आपणास दिसून येते.

1993 सालच्या घटनादुरुस्ती होऊन स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला त्यामुळे त्यांना संविधानाचे संरक्षण मिळाले स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्थानिक शासन हा विषय राज्य सूचीत समाविष्ट केला होता त्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर राज्य शासनाचे नियंत्रण अधिक प्रमाणात होते त्यामुळे राज्य शासनाच्या इच्छेप्रमाणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालत असे त्यामुळे नागरिकांनी सर्व संस्थांना अधिक स्वायत्तता व बळकटी मिळवून देणे गरजेचे झाले

**कोल्हापूर महानगरपालिका**

कोल्हापूर शहराचा विकास लक्षात घेऊन शासनाने 15 डिसेंबर 1972 रोजी नगरपालिकेचे महानगर्पालिकेत रूपांतर केले.त्यामुळे हा नागरिक प्रशासनातील महत्त्वपूर्ण टप्पा कोल्हापूर शहराने पार केलेला आपणास दिसून येतो. महानगरपालिकेच्या निर्मितीमुळे शहराच्या विकासाला एक नवीन दिशा प्राप्त झाली.1978 मध्ये खऱ्या अर्थाने पहिले लोकनियुक्त महानगरपालिका अस्तित्वात आली बाबासाहेब कसबेकर 1978 ते 1979 मध्ये पहिले महापौर बनले

कोल्हापूर जिल्ह्यात सध्या 9 नगरपरिषदा कार्यरत असून इचलकरंजी येथील नगर परिषदेत सर्वाधिक नगरसेवक असल्याचे दिसून येते कोल्हापूर जिल्ह्यातील नगरपरिषदेच्या दर्ज्याचा विचार करता इचलकरंजी नगरपरिषद अ दर्जाची नगरपालिका असून जयसिंगपूर नगरपरिषदेच्या दर्जा ब हा आहे इतर नगरपरिषदेचा विचार करता त्यात पन्हाळा, गडहिंग्लज, मुरगुड, पेटवडगाव मलकापूर, कुरुंदवाड, कागल या नगरपरिषदेचा क हा दर्जा आहे. नगारपरिषदेचा हा दर्जा तेथील लोकसंखेवर अवलंबूनअसतो.

**महानगरपालिकेची रचना**

महानगरपालिका ही एक निगम विकास (एक व्यक्ती भूत) संस्था असून तिला कायद्याने स्वतंत्र अस्तित्व असते तिला स्वतःचे नाव, नावाचा शिक्का असतो तिला संपत्ती संपादन करण्याचा,विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असतो महानगरपालिकेला दुसऱ्यावर दावा दाखल करू शकते आणि तिच्यावर इतरांना दावा दाखल करता येतो. महानगरपालिकेच्या रचनेचा अभ्यास करताना पुढील घटकांचा विचार करणे गरजेचे आहे

**परिषद**

प्रत्येक महानगरपालिकेत एक परिषद असते परिषदेतील सदस्यांची संख्या ही त्या शहराच्या लोकसंख्येवर अवलंबून असते राज्य निर्वाचन मंडळ प्रत्येक महानगरपालिकेची सदस्य संख्या निश्चित करून देते सदस्य संख्या निश्चित झाल्यानंतर लोकसंख्येच्या समान तत्त्वावर शहराचे विविध प्रभाग पाडण्यात येतात एका प्रभागातून एकच प्रतिनिधी निवडला जातो ही निवड प्रत्यक्ष गुप्त मतदान पद्धतीने होत असते ज्या नागरिकाचे वय 18 वर्षे पूर्ण असते त्या त्याला महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असतो मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये राज्य निर्वाचन आयोग महानगरपालिकेची सदस्य संख्या निश्चित करते कोल्हापूर महानगरपालिकेच्या विचार करता महानगरपालिका सदस्य संख्या आहे 81 एवढी असलेली आपणा दिसून येते.

**नामनिर्देशित सदस्य**

महानगरपालिकेत नामनिर्देशित सदस्यांची संख्या ही जास्तीत जास्त पाच एवढी असते या नियुक्त होणाऱ्या सदस्यांना महानगरपालिकेच्या प्रशासनाचे ज्ञान व अनुभव असणे आवश्यक असते नामनिर्देशित सदस्य हे महानगरपालिकेच्या बैठकीस उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना मतदानाचा हक्क नसतो महानगरपालिकेच्या निवडून द्यावयाच्या एकूण जागेपैक्की राज्य निवडणूक मंडळ ठरवून देईल तेवढ्या जागा अनुसूचित जाती, जमाती ,नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि महिला यांच्यासाठी आरक्षित केल्या जातात. महानगरपालिकेच्या ½ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जातात.

**महानगरपालिकेचे पदाधिकारी**

महापौर व उपमहापौर हे पद महानगरपालिकेत असते महापौर हे महानगरपालिकेतील सर्वात श्रेष्ठ पद मानले जाते तो महानगरपालिकेचा राजकीय प्रमुख असतो. महापौरांची निवड ही निर्वाचित सदस्यांच्या पहिल्या बैठकीत होते. सर्व निर्वाचित सदस्य आपल्या मधून एकाची महापौर आणि आणखी एकाची उपमहापौर म्हणून निवड करतात.

**सभागृहाचा नेता आणि विरोधी पक्ष नेता**

सभागृहाचा नेता आणि विरोधी पक्ष नेता ही दोन्ही पदे महानगरपालिकेत निर्माण केले जातात. महानगरपालिकेच्या

निर्वाचित सदस्यात ज्या पक्षाचे संख्याबळ मोठे असते त्या पक्षाच्या नेत्याला सभागृहाचा नेता केला जातो त्यास महापौर मान्यता देतात तर महानगरपालिकेत सर्वात मोठे संख्याबळ असलेल्या विरोधी पक्ष्याच्या नेत्याला विरोधी पक्ष नेता म्हणून महापौर मान्यता देत असतात.

**नगर आयुक्त**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 36 मध्ये नगर आयुक्त यांच्या नियुक्तीची तरतूद केलेली आहे तसेच त्याची नेमणूक करण्याचा अधिकार राज्य शासनाला असतो. नगर आयुक्त हा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यकारी प्रमुख म्हणून काम करीत असतो त्यामुळे तो महानगरपालिकेत सर्वोच्च अधिकारी बनलेला असतो परंतु काही वेळेस महानगरपालिकेत आयुक्त व महापौर यांचे जमत नाही त्यासाठी महापौरांनी लोकप्रतिनिधी आणि महापौरांच्या पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहून कार्य करणे गरजेचे असते.

**महानगरपालिकेच्या समित्या**

महानगरपालिका नागरी प्रशासनातील एक महत्वाची संस्था असते महानगरपालिकेचा कारभार हा विविध समितीच्या माध्यमातून चालवल्या जातो त्यात

**1.स्थायी समिती**

प्रत्येक महानगरपालिकेत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये कलम 20 प्रमाणे ही समिती स्थापन केली जाते या समितीत 16 सदस्य यांचा समावेश असतो दरवर्षी या समितीचे निम्मे सदस्य निवृत्त होतात व तेवढेच नवीन सदस्य परत घेतले जातात त्यामुळे ही समितिअखंडपणे काम करणारी समिती म्हणून ओळखले जाते.

**2.परिवहन समिती**

महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केला असेल तर तो चालवण्यासाठी परिवहन समितीची स्थापना केली जाते. परिवहन समिती मध्ये महानगरपालिकेचे 13 सदस्य असतात त्यांची निवड ही महानगरपालिकेच्या सदस्या मधूनच केली जाते .स्थायी समितीचा अध्यक्ष हा या समितीचा पदसिध्द सदस्य असतो तर इतर सदस्य हे ज्या व्यक्तीला प्रशासनाचे किंवा परिवहनाचा अनुभव आहे अशा सदस्या मधून त्यांची निवड केली जाते या समितीचे ½ सदस्य हे दर दोन वर्षांनी निवृत्त होतात व तेवढेच नवीन सदस्य घेतले जातात.

**3.प्रभाग समिती** महानगरपालिकेच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्या स्थापन केल्या जातात. एकाच प्रभाग समितीत समाविष्ट करण्यात प्रभाग सलग असावे लागतात .कोणत्या प्रभाग समितीत कोणत्या प्रभागाचा समावेश करायचा यासंबंधी चा अधिकार महानगरपालिकेला देण्यात आला आहे. प्रभाग समिती चा कार्यकाल हा पाच वर्षाचा असतो.

**4.विशेष व तदर्थ समिती**

महानगरपालिका वेळोवेळी विशेष समितीची स्थापना करू शकते. उदाहरणात महिला व बालकल्याण या समितीत 75 टक्के सदस्य हे निर्वाचित महिला सदस्यातून असावे लागतात .तदर्थ समिति स्थापन करताना महानगरपालिका आपल्या सदस्यातून वेळोवेळी तिला योग्य वाटतील तेवढ्या पालिका सदस्याचा समावेश असलेल्या समित्या नेमून शकतात परंतु महानगरपालिकेच्या विशेष समित्या व तदर्थ समिती यांची एकूण संख्या पाच पेक्षा जास्त असू शकत नाही.

**महानगरपालिकेचे कार्य**

आधुनिक काळात शहरीकरणाचा वेग वाढल्यामुळे त्यातच शहराची लोकसंख्या वाढत असल्याने नागरी प्रशासन अधिक व्यापक बनलेले आहे. नागरिकांच्या जीवनाशी निगडित असलेल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करणेयाची जबाबदारि महानगरपालिककेवर येऊन पडलेली आहे. सामन्यातहा महानगरपालिकेला दोन प्रकारचे कार्य पार पाडावे लागतात त्यात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 63 नुसार अनिवार्य कार्य व कलम 66 ऐच्छिक कार्य करावे लागतात महानगरपालिकेला अनिवार्य कार्य पार पाडावेच लागतात परंतु महानगरपालिकेने ऐच्छिक कार्य केलेच पाहिजेत असे बंधन नसते ज्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती उत्तम आहे ती महानगरपालिका ऐच्छिक स्वरूपाचे कार्य करू शकते एखादी महानगरपालिका अनिवार्य कार्य करण्यास असमर्थ असेल किंवा ते कार्य पार पाडण्यात कुचराई करत असेल तर राज्य शासन ती महानगरपालिका बरखास्त करू शकते.

थोडक्यात, महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या 30 टक्के लोक हे महानगरपालिका क्षेत्रात राहतात. याचाच अर्थ महाराष्ट्रातील एक चतुर्थांश लोक महानगरपालिका क्षेत्रात राहतात. त्यामुळे त्यांच्या समस्या सोडवण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेवर येऊन पडते परंतु वाढता खर्च आणि घटक जाणारे उत्पन्न या बाबीचाविचार करता महानगरपालिकेला वारंवार राज्य शासनाकडे हात पसरावे लागतात तेव्हा अशा

VOL- VIII | ISSUE- VIII | AUGUST | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x

काळात या महानगरपालिकांना पुरेशा प्रमाणात वित्त पुरवठा होणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची**


1. बी. बी.पाटील, उर्मिला चव्हाण, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, फडके प्रकाशन कोल्हापूर 2020.
2. पी .बी पाटिल महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, के सागर पब्लिकेशन, पुणे ,2012
3. दर्शनकार अर्जुनराव, पंचायतराज आणि नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद 1992
4. गोविंद यमलवाड, स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन नांदेड, 2001
5. कि. का. चौधरी, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर ,कोल्हापूर जिल्हा, महाराष्ट्र शासन 1989
6. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा कोल्हापूर, जिल्हा सांख्यिकीसंचालनालय, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, कोल्हापूर , 2019


Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www aiirjournal.com